10-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/09/2025 11:08 PM Page 1



स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या दाव्याबाबत अनेक विसंगती उघड पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारताचा इंग्लंडवर दणदणीत विजय पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १० फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 158 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 10 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### ट्रम्प आणि पुतिन आमने-सामने

**इंफाल, दि. ९ :** भारतावरून अमेरिका आणि रशिया आमने सामने आल्याचे पाहायला मिळत आहे.. या दोन्ही महासत्तांना त्यांची सर्वात घातक असणारी विमाने भारताला विकायची आहेत. ट्रम्प यांना भारताला एफ३५ विमान विकायचे आहे, तर पुतिन हे भारताला एसयू-५७ विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत. अमेरिका आणि रशियाकडून विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली दोन्ही विमाने जगातील सर्वात नवीन विमाने आहेत. बंगळूरू येथील एअरो इंडिया शोमध्ये रशियाचे विमान दाखल झाले असून अमेरिकन लढाऊ विमानेही दाखल झाल्याचे वृत्त आहे. अमेरिका आणि रशियाच्या या दोन्ही लढाऊ विमानांबद्दल बोलायचे झाले तर, ही दोन्ही पाचव्या जनरेशची लढाऊ विमाने आहेत. वैशिष्ट्य म्हणजे दोघांनाही रडारने शोधणे शक्य नाही आणि या विमानाचा प्रचंड वेग ही खरी ताकद आहे.

जर आपण लढाऊ श्रेणीच्या विचार केल्यास तर येथे रशियाच्या ङण-५% ची तुलना करता येत नाही. या वैशिष्ट्यांमुळेच रशिया भारताला हे विमान विकण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र पुतिन यांचे हे लढाऊ विमान अद्याप कोणत्याही देशाने खरेदी केलेले नाही. भारताने या विमानाचा पहिला ग्राहक बनावे अशी पुतिन यांची इच्छा आहे.

---

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू महाकुंभमेळ्याला देणार भेट

**नवी दिल्ली, दि. ९ :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभमेळ्याला आतापर्यंत कोट्यवधि भाविकांनी भेट दिली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्रिवेणी संगमावर जाऊन अमृतस्नान केले. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूही उद्या सोमवारी (१० फेब्रुवारी) महाकुंभमेळ्याला जाणार आहेत. राष्ट्रपती भवन कार्यालयातून ही माहिती मिळाली आहे. पौष पौर्णिमेला (१३ जानेवारी) सुरू झालेला महाकुंभ हा जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मेळावा आहे, जो जगभरातील भाविकांना आकर्षित करतो. हा मेळा २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीपर्यंत सुरू राहील. प्रयागराज येथील त्यांच्या एकदिवसीय दौऱ्यादरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संगम येथे पूजा करून पवित्र स्नान करतील. अक्षयवट आणि हनुमान मंदिरात पूजा आणि दर्शन घेतील.

---

### छत्तीसगडमध्ये ३१नक्षली ठार; २ जवान शहीद

**विजापूर, दि. ९ :** छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर रविवारी झालेल्या चकमकीत १००० हून अधिक सैनिकांनी ३१ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. या चकमकीत २ डीआरजी आणि एसटीएफ जवान शहीद झाले आणि २ जखमी झाले. जवानांनी १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. मृत नक्षलवाद्यांची ओळख पटवली जात आहे. बस्तर रेंजचे आयजी सुंदरराज पी म्हणाले की, घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. विजापूरच्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरात शोध सुरू आहे. दरम्यान, बिजापूरचे एसपी जितेंद्र यादव म्हणाले की, मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांची संख्या वाढत आहे. हे एक मोठे ऑपरेशन आहे. बॅकअप पार्टी पाठवली आहे. या वर्षी आतापर्यंत छत्तीसगडमध्ये ८१ नक्षलवादी मारले गेले आहेत, त्यापैकी ६५ बस्तर विभागात मारले गेले. त्यात विजापूरसह ७ जिल्हे समाविष्ट आहेत.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# 'स्मार्ट सिटी'च्या कामात पुन्हा हलगर्जी

## गॅस पाईपलाईन फुटल्याने रहिवाशांमध्ये भीती





■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ : काही दिवसांपूर्वीच भाटले येथे मुख्य पाण्याची पाईपलाईन फुटून परिसरात मोठा पूर आला होता, आणि रहिवाशांना त्यांच्या घरातील साहित्य वाचवण्यासाठी धावपळ करावी लागली होती. मात्र, त्या घटनेला अजून आठवडाही उलटला नाही तोच रविवारी राम मंदिराजवळ स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कामादरम्यान गोवा नॅचरल गॅस लिमिटेडची घरगुती गॅस पाईपलाईन फुटली आणि धोका निर्माण झाला.**

घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी सांगितले की, दुपारी साडेचारच्या सुमारास जेसीबी मशीनच्या साहाय्याने सांडपाणी प्रकल्पाचे काम सुरू होते. मात्र, कामगारांना त्या ठिकाणी गॅस पाईपलाईन असल्याची कल्पना नसल्यामुळे मोठा धोका निर्माण झाला. घटनेची माहिती मिळताच पणजी पोलीस आणि अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेनंतरही स्मार्ट सिटी प्रकल्पाचे कोणतेही अधिकारी घटनास्थळी उपस्थित नव्हते, अशी नागरिकांची तक्रार आहे. विशेष म्हणजे, अलीकडेच इमॅजिन पणजी स्मार्ट सिटीचे एमडी आणि सीईओ संजीत रॉड्रिग्ज यांनी स्मार्ट सिटीच्या कोणत्याही प्रकल्पात अडथळा आल्यास तातडीने प्रतिसाद मिळेल, असे स्पष्ट केले होते. मात्र, या घटनांमुळे प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गोवा नॅचरल गॅस लिमिटेडचे अग्निशमन आणि सुरक्षा व्यवस्थापक मेहदी कमाल यांनी सांगितले की, सीवरेजशी संबंधित काम सुरू असताना गॅस पाईपलाईन फुटली. घटनेची माहिती मिळताच आमच्या आपत्कालीन प्रतिसाद पथकाने घटनास्थळी पोहोचून गॅस गळती रोखली आणि तातडीने दुरुस्ती सुरू केली. या गॅस पाईपलाईनद्वारे आम्ही पणजीतील सुमारे ४ हजार ग्राहकांना गॅस पुरवतो.त्यांनी असेही सांगितले की, अन्य विभागांकडून खोदकाम केल्यास अशा घटना वारंवार घडतात, आणि आमच्यासोबत कोणताही समन्वय साधला जात नाही. त्यामुळे भविष्यात अशा धोकादायक घटनांना आळा घालण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

या घटनेबाबत प्रतिक्रिया देताना पणजी नगरसेवक आणि माजी महापौर उदय मडकईकर म्हणाले, यापूर्वी पाण्याची पाईपलाईन फुटली, आता गॅस पाईपलाईन. मला समजत नाही हे काय चाललं आहे. स्मार्ट सिटीच्या कामांमध्ये सातत्याने निष्काळजीपणा दिसून येतो. प्रशासनाने अधिक दक्षता घेणे आवश्यक आहे.तसेच त्यांनी पुढे सांगितले की, आम्ही भाग्यवान आहोत की गॅस गळतीमुळे कोणतीही दुर्घटना घडली नाही. मात्र, कामगारांना गॅस पाईपलाईनच्या अस्तित्वाची माहिती नसणे हे गंभीर आहे. रायबंदर घटनेत एका कामगाराचा मृत्यू झाल्यापासून आम्ही सातत्याने मागणी करत आहोत की कंत्राटदारांनी त्यांच्या कामगारांना सुरक्षा उपकरणे पुरवावीत. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व कामगारांना योग्य प्रशिक्षण आणि सुरक्षा साधने पुरवणे अत्यावश्यक आहे. या सातत्याने घडणाऱ्या दुर्घटनांमुळे स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या व्यवस्थापनावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक उपाययोजना केल्या जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माणिपूरच्या मुख्यमंत्री बिरेन सिंहचा राजीनामा

**मणिपूर, दि. ९ :**

मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. रविवारी संध्याकाळी एन. बिरेन सिंह यांनी राजभवनात जाऊन राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची भेट घेतली आणि त्यांच्याकडे राजीनामा सादर केला.

एन. बिरेन सिंह २०१७ पासून मणिपूरचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या नेतृत्वाखालील मणिपूरमध्ये दुसऱ्यांदा भाजपचं सरकार आलं आहे.दरम्यान, गेल्या काही महिन्यांत मणिपूरमध्ये झालेल्या हिंसाचारामुळे अनेकदा विरोधकांनी बिरेन सिंह यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.त्यांच्यावर हिंसाचार नियंत्रित करण्यात अपयश आल्याचा आरोप होत आला आहे.मणिपूरमधल्या कुकी आणि मैतेई या दोन समाजांमध्ये ३ मे २०२३ ला संघर्ष सुरू झाला.

पीटीआय या वृत्तसंस्थेने अधिकाऱ्यांच्या हवाल्याने सांगितले की, मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी राजभवनात जाऊन राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याकडे राजीनामा सादर केला. सिंह यांच्यासोबत भाजप आणि एनपीएफ (नागा पीपल्स फ्रंटचे) इतर १४ आमदारही राजभवनात उपस्थित होते.

२०१७ मध्ये एन. बिरेन सिंह पहिल्यांदाच मणिपूरचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरमध्ये भाजप सरकारचा हा सलग दुसरा कार्यकाळ आहे.असं असलं तरी,

**▶ एन. बिरेन सिंह यांनी हिंसाचारानंतर दीड वर्षाने दिला राजीनामा**

गेल्या काही महिन्यांत मणिपूरमध्ये झालेल्या मोठ्या हिंसाचारामुळे बिरेन सिंह यांच्यावर विरोधकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले.

भारताच्या ईशान्येकडील मणिपूर राज्य मे २०२३ पासून हिंसाचाराने होरपळून निघत आहे.कुकी आणि मैतेई या दोन समुदायांमधील हिंसाचारामुळे येथे शेकडो लोकांचे प्राण गेले आहेत. तेव्हापासून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.दरम्यान, हिंसाचार नियंत्रित करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप विरोधकांनी वारंवार केला आहे. तसेच बिरेन सिंह यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली आहे.मणिपूरमध्ये हिंसाचार सुरू झाल्यानंतर काही दिवसांनी बिरेन सिंग राजीनामा देतील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, बिरेन सिंह यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता.

या काळात बिरेन सिंग यांच्या नावाने लिहिलेल्या कथित राजीनामा पत्राचा फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता यानंतर लगेचच त्यांनी ट्विटरवर म्हटलं होतं की, या महत्त्वाच्या टप्प्यावर मी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नाही, हे मी स्पष्ट करू इच्छितो.

एकेकाळी मणिपूरमधील फुटबॉल खेळाडू म्हणून राष्ट्रीय ख्याती

पान २ ▶

# फोंडा कार्निव्हल प्रेमींचा सरकारवर संताप; अनुदानाविना परेडचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड





**फोंडा, दि. ९ :** गोव्यातील कार्निव्हल उत्सव हा लोकांना एकत्र आणणारा सोहळा मानला जातो, मात्र फोंडा येथील कार्निव्हल प्रेमींमध्ये सरकारच्या भूमिकेबद्दल तीव्र नाराजी आहे. गेल्या तीन वर्षांपासून वारंवार प्रयत्न करूनही सरकार फोंडा कार्निव्हल परेडसाठी अनुदान मंजूर करण्यास तयार नसल्याने स्थानिक रहिवासी संतप्त झाले आहेत.

या परिस्थितीला तोंड देण्यासाठी, फोंडयातील कार्निव्हल प्रेमींनी आठवडाभरापूर्वी बैठक घेतली होती. सरकारी अनुदानाविना परेड आयोजित करण्यासाठी त्यांनी देणगीदार आणि नागरिकांकडून निधी संकलनाचा निर्णय घेतला. यासाठी 'फोंडा पीपल्स कार्निव्हल कमिटी' स्थापन करण्यात आली असून, ऑगस्टिन फर्नांडिस यांच्या अध्यक्षतेखाली परेडचे नियोजन सुरू आहे. ४ मार्च रोजी दुपारी ४ वाजता फोंडयात कार्निव्हल परेड आयोजित केली जाणार आहे.परेडची सुरुवात तिस्क फोंडा येथून होईल आणि फोंडा बस स्थानक येथे समाप्त होईल.

ऑगस्टिन फर्नांडिस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, सरकारने फक्त पणजी, पर्वरी, , मडगाव, म्हापसा आणि वास्को येथेच अधिकृत कार्निव्हल परेडचे आयोजन जाहीर केले आहे. फोंडा येथील कार्निव्हल प्रेमींनी स्थानिक आमदार आणि मंत्री रवी नाईक यांची भेट घेतली होती. त्यांनी हा विषय पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांच्या पुढे मांडण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, यापूर्वीही अशा आश्वासनांनंतर अनुदान मिळाले नसल्याने, यंदा पुन्हा मंत्र्यांकडे जाण्याचा निर्णय टाळण्यात आला आहे. सरकारने अनुदान मंजूर केले किंवा नाही, तरीही आम्ही परेड आयोजित करणार. यासाठी नागरिकांनी मदतीसाठी पुढे यावे,असे ऑगस्टिन फर्नांडिस यांनी स्पष्ट केले. फोंड्यातील कार्निव्हल प्रेमींनी सरकारच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. फोंडामध्ये चार मतदारसंघ असूनही सरकारने येथे

पान २ ▶

# चिखली येथे जागतिक पाणथळ भूमीदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** जागतिक पाणथळ भूमी दिन २०२५ च्या पार्श्वभूमीवर चिखली युथ फार्मर्स क्लब तर्फे स्थानिक तलाव परिसंस्थांचा शोध घेण्यासाठी विशेष शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात स्थानिक रहिवासी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या वर्षीच्या आपल्या सामान्य भविष्यासाठी पाणथळ भूमींचे संरक्षण या थीम अंतर्गत झालेल्या या उपक्रमात ४० हून अधिक स्थानिक रहिवासी आणि विद्यार्थी सहभागी झाले. चिखली जैवविविधता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुई कोस्टा अरौजो तसेच पंच सदस्य रोमन वाझ आणि फ्रान्सिस्को नुनेस यांसारखे स्थानिक अधिकारी देखील उपस्थित होते. हा उपक्रम गोवा राज्य विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद, रेजिना मुंडी स्कूल, डायोसेसन कमिशन ऑफ इकोलॉजी गोवा आणि जैवविविधता व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

सेंट जोसेफ वाझ कॉलेज, कुठ्ठाळी येथील वनस्पतिशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. फादर बोलमॅक्स परेरा यांनी गिना - पेंटा - ड्यूसा वॉर्डमधील सात तलावांच्या अन्वेषणासाठी मार्गदर्शन केले. त्यांनी या तलावांचे ऐतिहासिक महत्त्व आणि त्यांच्या वैशिष्ट्यांविषयी सहभागींना माहिती दिली.

स्थानिक रहिवासी जुवेन्सियो आणि लुसिया फर्नांडिस यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, आमच्या गावातील तलावांचे सौंदर्य अनुभवण्याची संधी मिळाली. हे नैसर्गिक ठेवे जतन करणे गरजेचे आहे, अन्यथा पुढील पिढ्या आम्हाला दोष देतील. सर्जियो रॉड्रिग्ज यांनी शहरीकरणामुळे पाणथळ प्रदेशांना धोका निर्माण होत असल्याकडे लक्ष वेधले. या परिसंस्थांचे सौंदर्य जसे विस्मयचकित करणारे आहे, तसेच त्यांच्यावर होणारे अतिक्रमण चिंतेचा विषय आहे,असे ते म्हणाले.

या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने आपले अनुभव सांगितले. तलावांमध्ये आढळणाऱ्या जैवविविधतेबद्दल खूप काही शिकता आले. विशेषतः मासे, पक्षी आणि खारफुटी मला आकर्षित केल्या, असे पाचवीच्या विद्यार्थिनी अधिरा मेश्राम हिने सांगितले. तर नववीतील विद्यार्थिनी प्रियांका भुक्ताने हिने शहरीकरणामुळे होणाऱ्या पर्यावरणीय नुकसानीबद्दल चिंता व्यक्त केली.

युथ फार्मर्स क्लब च्या कोषाध्यक्ष

पान २ ▶

# वेळसावमध्ये बेकायदेशीर डंपिंग थांबवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड







**मडगाव, दि. ९ :** वेळसावच्या स्थानिक रहिवाशांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेत दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी प्राइमवाडा वेळसाव येथे सुरू असलेले बेकायदेशीर भू-भरण आणि बांधकाम साहित्य डंपिंग थांबवण्याचा आदेश दिला आहे. दक्षिण गोवा उपजिल्हाधिकारी वेल्टन टेलिस यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी करण्यात आला आहे. स्थानिकांकडून या बेकायदेशीर कामाबाबत तक्रारी आल्यानंतर प्रशासनाच्या फ्लाइंग स्क्वॉडने या प्रकरणाची पाहणी केली. चौकशीत समोर आले की, सर्वेक्षण क्रमांक ६०/२, ६०/४, ५९/१-अ, ५८/८-अ, ५८/१० आणि ५८/११ या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर भू-भरण आणि डंपिंग सुरू होते.

तपासणीदरम्यान, या ठिकाणी नगर नियोजन विभागाच्या मंजुरीचा कोणताही फलक आढळला नाही. तसेच कोणत्याही अधिकृत परवानग्या उपलब्ध करून दिल्या गेलेल्या नव्हत्या, त्यामुळे हे टीसीपी कायदा, १९७४ च्या कलम १७(ए) चे उल्लंघन असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले. याप्रकरणी वेर्णा पोलिस निरीक्षकांना बेकायदेशीर डंपिंग आणि भू-भरण तात्काळ थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुरगाव उपजिल्हाधिकाऱ्यांना भविष्यात अशा प्रकारची बेकायदेशीर कृती होऊ नये याची खात्री करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, नगररचनाकारांना याप्रकरणी तातडीने कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने आदेश लागू केल्यानंतर बेकायदेशीर काम थांबले असून, स्थानिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. मात्र, रहिवाशांना भीती आहे की, रेल्वे अधिकारी अधिकृत आदेशाला डावलून पुन्हा काम सुरू करण्याचा प्रयत्न करू शकतात. गेल्या काही आठवड्यांपासून आमच्यासाठी जगणे कठीण झाले आहे. आमच्या घरांसमोर ट्रक भरून माती टाकली जात आहे, ज्यामुळे आमचा गावातील इतर भागांशी संपर्क तुटला आहे. आमची वाहने घराच्या आवारात अडकली होती आणि बाहेर काढणे अशक्य झाले होते, असे एका स्थानिकाने सांगितले. स्थानिकांनी मदतीसाठी रेल्वे अधिकाऱ्यांकडे धाव घेतली असता, थांबण्याचे आदेश मिळवा, असे प्रत्युत्तर देण्यात आले. आम्हालाच आमच्या गावात उपेक्षितपणे वागवले जात आहे. हे विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी अपमानास्पद होते, असे एका ग्रामस्थाने सांगितले.

या प्रकरणात स्थानिकांना पाठिंबा देणाऱ्या गोयचो एकवोट संस्थेने स्टॉप वर्क ऑर्डर हा महत्त्वपूर्ण हस्तक्षेप असल्याचे म्हटले आहे, मात्र अजूनही संघर्ष संपलेला नाही, असे संस्थेचे संस्थापक ऑरव्हिल डोराडो रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले. ग्रामपंचायतीने याआधीही असे आदेश दिले होते, परंतु कंत्राटदारांनी जबरदस्तीने काम सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला होता. यावेळीही अधिकाऱ्यांनी कठोर अंमलबजावणी करावी,असे त्यांनी सांगितले. काम तात्पुरते थांबवण्यात आले असले तरी, प्रवेश मार्गाच्या नुकसानामुळे स्थानिक चिंतेत आहेत. गेल्या अनेक पिढ्यांपासून आम्ही या मार्गाचा वापर करत आहोत. रेल्वे ट्रॅक बांधण्याच्या अगोदरपासून येथे आमची घरे आहेत, असे एका रहिवाशाने सांगितले.

पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी मडगाव येथील सर्वेक्षण आणि भूमी अभिलेख निरीक्षक कार्यालयात होणार आहे. स्थानिकांनी प्रशासनावर दबाव कायम ठेवण्याचा निर्धार केला असून, आमच्या हक्काचा रस्ता पुनर्संचयित झाल्याशिवाय आम्ही माघार घेणार नाही, असे एका रहिवाशाने स्पष्ट केले. स्थानिक रहिवाशांच्या संघर्षाला केवळ तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी, प्रशासनाने आदेशाची पूर्ण अंमलबजावणी करूनच या समस्येवर ठोस तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.